**मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक या संवर्गातील कर्मचा-यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीद्वारे गुणवत्तेनुसार नियुक्तीसाठी सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा- २०१८.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: मविप १४१७/प्र.क्र.१३२/१४-अ,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०१८

**शासन परिपत्रक**

मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांना सहायक कक्ष अधिकारी पदावर निवडीद्वारे नियुक्ती देण्यासाठी शनिवार, **दिनांक १९ जानेवारी, २०१९** रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा - २०१८ फक्त **मुंबई** येथे आयोजित करण्यात येईल.

२. प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

२.१ **मंत्रालयीन विभागातील गुणवत्तेनुसार - ५८ पदे**

२.२ **महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील गुणवत्तेनुसार - ४ पदे**

२.३ वर नमूद पदसंख्येमध्ये बदल होण्याची शक्यता आहे.

२.४ सदर पदे ही गुणवत्तेनुसार मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/१०१७ च्या अंतिम न्याय निर्णयाचे अधिन राहुन, सदरहू पदे गुणवत्तेनुसार भरण्यात येत आहेत.

३. **पात्रता :-**

३.१ खुद्द मंत्रालयीन प्रशासकीय विभाग तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयातील लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेस अर्ज करण्यासाठी पात्र आहेत. मंत्रालयीन प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखालील कोणत्याही दुय्यम कार्यालयातील कर्मचारी प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज करण्यास पात्र नाहीत.

३.२ दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गामध्ये किमान सलग सात वर्षे विनाखंड नियमित सेवा पूर्ण झालेले कर्मचारी प्रस्तुत परीक्षेकरीता अर्ज करण्यास पात्र आहेत.

३.३ नियमित सेवेचा कालावधी खालीलप्रमाणे गणण्यांत येईल :-

(१) आयोगामार्फत नामनिर्देशनाने नेमणूक झालेले कर्मचारी:- नियमित नियुक्तीच्या दिनाकापासून

(२) अनुकंपा तत्वावर नेमणूक झालेले कर्मचारी:- नियुक्तीच्या दिनाकापासून

(३) पदोन्नत कर्मचारी:- सेवाप्रवेश नियमातील गुणवत्तेनुसार नियमित पदोन्नतीच्या दिनाकापासून

(४ अन्य कारणास्तव सेवा नियमित झालेले कर्मचारी:- त्यांच्या सेवा नियमित केल्या संबंधीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या आदेशाच्या दिनांकापासून

३.४ कोणत्याही परिस्थितीत लिपिक, लिपिक-टंकलेखक व टंकलेखक संवर्गातील पदावरील अभावित नियुक्तीचा कालावधी पात्रतेसाठी गणण्यात येणार नाही.

३.५ लिपिकवर्गीय कर्मचा-यांसाठी असलेली सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण न झालेले अथवा सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिलेली नाही, असे कर्मचारी प्रस्तुत परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र असणार नाहीत.

४ **परीक्षेचा टप्पा - एक** - लेखी परीक्षा - २०० गुण

५. **शुल्क :-**

५.१ अमागास - **रुपये ५२४/-** ५.२ मागासवर्गीय - **रुपये ३२४/-**

६. **परीक्षा केंद्र:**

| **परीक्षा केंद्र** | **केंद्र संकेतांक** |
|---|---|
| मुंबई | ३० |

७ **अर्ज करण्याची पध्दत :-**

७.१ प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येतील.

७.२ पात्र उमेदवाराला वेब-आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळाद्वारे **दिनांक ५ नोव्हेंबर, २०१८ ते दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

७.३ ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

७.४ आयोगास अर्ज सादर करताना माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नावाची नोंदणी करणे व आयोगास अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

७.५ आयोगास चुकीची माहिती सादर करणा-या उमेदवारास सदर परीक्षेसाठी व यापुढील सर्व निवडीकरिता अपात्र ठरविण्यात येईल.

७.६ आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

७.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

७.७.१ शुल्क भरण्याकरीता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

७.७.२ "माझे खाते" या लिंकवर क्लिक केल्यानंतर "माझे ॲप्लीकेशन" सदरातील 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंकवर क्लिक करावे.

७.७.३ 'स्पर्धात्मक परीक्षा' या लिंक वर क्लिक केल्यानंतर अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. 'Unpaid' लिहिलेल्या पद/परीक्षेसमोर 'Pay Now' अशी लिंक उपलब्ध असेल.

७.७.४ "Pay Now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील. (अ) ऑनलाईन पेमेंट (ब) नागरी सुविधा केंद्र (क) चलनाव्दारे

७.७.५ क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन परीक्षा शुल्क अदा करत

७.७.६ नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. सदर कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

७.७.७ चलनाव्दारे परीक्षा शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो.

७.७.८ भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरण्याचा पर्याय निवडल्यास अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर केल्यास त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

७.७.९ **विहित पध्दतीने अर्ज सादर करुन ऑनलाईन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक २६ नोव्हेंबर, २०१८ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

७.७.१० **चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही. तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.**

७.७.११ ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्काचा भरणा केल्यानंतर उमेदवाराला त्याच्या प्रोफाईलमध्ये परीक्षा शुल्काचा भरणा झाला आहे किंवा कसे याची स्थिती (status) अवगत होईल. त्याची उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीच तपासणी करुन खात्री करणे अथवा परीक्षा शुल्काचा भरणा झाल्याबाबतची स्थिती उपलब्ध नसल्यास पुन्हा शुल्क भरण्याची अथवा चलन घेण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. विहित दिनांकानंतर यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.

८ अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे परिपत्रकातील विहित अर्हतेबाबतच्या अटींची पूर्तता करतात असे समजून पात्रता न तपासता आयोगाकडून उमेदवारांना तात्पुरता प्रवेश दिला जाईल. परंतु परीक्षेपूर्वी अथवा परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर, उमेदवाराने अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची वा खोटी असल्याचे अथवा उमेदवार विहित अर्हतेची पूर्तता करीत नसल्याचे आयोगास आढळल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि त्याबाबतचा आयोगाचा निर्णय अंतिम राहिल.

९. **सर्वसाधारण :-**

९.१ ऑनलाईन पध्दतीने आयोगास सादर केलेल्या अर्जाच्या प्रतीसह अर्ज केल्याबाबतची माहिती उमेदवारांनी स्वत: आपल्या विभाग/कार्यालय प्रमुखांना कळविणे आवश्यक आहे.

९.२ प्रस्तुत परीक्षेचा अर्ज विचारात घेण्यास विभाग/कार्यालय प्रमुखांना कोणताही आक्षेप असल्यास तसे विभाग/कार्यालय प्रमुखांनी अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत आयोगास कळविणे आवश्यक आहे. तसेच परीक्षेकरीता अर्ज विचारात घेण्यास हरकत नसल्यास आयोगास तसे कळविण्याची आवश्यकता नाही; असेही उमेदवारांनी संबंधित विभाग/कार्यालय प्रमुखांना कळवावे.

९.३ प्रस्तुत परीक्षा ही स्पर्धा परीक्षा असून पदोन्नतीसाठी पात्रता परीक्षा (Qualifying Examination) नाही. प्रस्तुत परीक्षेच्या निकालाच्या आधारे आयोगाकडून शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांची पात्रता सक्षम प्राधिकाऱ्याकडून तपासण्याच्या अधीन राहून नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल. सदर परीक्षेमधील उमेदवारांच्या कामगिरीच्या (Performance) आधारे नियुक्ती मागण्याचा उमेदवारास कोणताही हक्क असणार नाही.

९.४ परीक्षेस अर्ज सादर केल्यानंतर अथवा परीक्षा दिल्यानंतर उमेदवाराने राजीनामा दिल्यास अथवा कोणत्याही कारणास्तव नोकरी सोडल्यास अथवा विभागाने सेवा समाप्त केल्यास अथवा धारणाधिकार न ठेवता संवर्गबाह्य पदावर नेमणूक झाल्यास सदर परीक्षेच्या निकालाच्या आधारे संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

**१० प्रवेशप्रमाणपत्र :-**

**१०.१** प्रस्तुत परीक्षेपूर्वी सर्वसाधारणपणे **७** दिवस अगोदर प्रवेशप्रमाणपत्र उमेदवाराच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१०.२** परीक्षेच्या वेळी उमेदवाराने स्वत:चे प्रवेशप्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय, परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१०.३** परीक्षेस येतेवेळी स्वत:च्या ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड, निवडणूक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी किमान कोणतेही **एक मूळ ओळखपत्र** तसेच मूळ ओळखपत्राची छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

**१०.४** परीक्षेच्या वेळी प्रवेश प्रमाणपत्र व इतर ओळखीच्या पुराव्यासह उमेदवाराने स्वत:चे अद्ययावत कार्यालयीन ओळखपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

**१०.५** आधार कार्डच्या ऐवजी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड केलेले ई-आधार सादर करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत ई-आधार वर उमेदवाराचे नाव, पत्ता, लिंग, फोटो, जन्मदिनांक या तपशीलासह आधार निर्मितीचा दिनांक (Date of Aadhaar generation) व आधार डाऊनलोड केल्याचा दिनांक असल्यासच तसेच सुस्पष्ट फोटोसह **कलर प्रिंट** मध्ये आधार डाऊनलोड केले असल्यासच ई-आधार वैध मानण्यात येईल.

**१०.६** नावांमध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत), नावांत बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र किंवा राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावांत बदल झाल्यासंबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११ परीक्षेस प्रवेश :-**

**११.१ फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशप्रमाणपत्र, ओळखीचा मूळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशप्रमाणपत्रावरील सूचनेनुसार आयोगाने परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल.**

**११.२** स्मार्ट वॉच, डिजीटल वॉच, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंतर्भूत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड, ब्ल्यु टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, वहया, नोटस, परवानगी नसलेली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (calculator) इत्यादी प्रकारची साधने/ साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची

मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

११.३ आयोगाने परवानगी नाकारलेले कोणत्याही प्रकारचे अनधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशद्वारावरच ठेवावे लागेल. अशा साधन/साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस आयोग, जिल्हा प्रशासन किंवा संबंधित शाळा/महाविद्यालय व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही

११.४ उमेदवाराने आयोगास सादर केलेल्या अर्जावरील स्वाक्षरी, हजेरीपटावरील स्वाक्षरी व अन्य सर्व प्रकारच्या पत्रव्यवहारावरील स्वाक्षरी एकच असणे व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा फरक/तफावत असता कामा नये. विविध प्रकारच्या कागदपत्रावरील स्वाक्षरीमध्ये फरक/तफावत आढळून आल्यास संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल व आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार इतरही कायदेशीर/नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**१२. बायोमॅट्रिक पडताळणी :-**

१२.१ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवाराच्या बायोमॅट्रिक सत्यापनासाठी (Genuiness) डिजिटल स्वरुपात उमेदवारांच्या बोटांचे ठसे आणि/अथवा बुब्बुळाच्या आधारे पडताळणी केली जाईल.

१२.२ बायोमॅट्रिक पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी त्यांच्या बोटांचे ठसे योग्यरित्या स्वीकारले गेले असल्याची खात्री करावी.

१२.३ बायोमॅट्रिक पडताळणीवेळी विसंगती आढळून आल्यास उमेदवारी नाकारली जावू शकते. तसेच पडताळणीच्यावेळी उमेदवार अस्सल नसल्याचे (not genuine) आढळून आल्यास त्याच्यावरील कायदेशीर कारवाईव्यतिरिक्त उमेदवारी रद्द होवू शकते, शिवाय आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधाची कारवाई होवू शकते. यास्तव, उमेदवारांना सूचित करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या हातावर मे**हं**दी, शाई, रसायन इत्यादी प्रकारची कोणतीही बाहयवस्तू / पदार्थ लावू नये.

१२.४ उमेदवारांनी आधार क्रमांक त्यांच्या खात्यात नमूद केले असले तरी काही उमेदवारांनी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) द्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या लॉक / अनलॉक सुविधेद्वारा त्यांची आधार क्रमांकाशी संलग्नित बायोमेट्रीक माहिती लॉक केली असल्यास त्यांचे परीक्षेच्या वेळी आधार प्रमाणीकरण (Aadhaar Authentication) व पर्यायाने बायोमेट्रिक पडताळणी न होण्याची शक्यता आहे. परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता उमेदवारांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक केली असणा-या उमेदवारांनी परीक्षा / मुलाखत / शारिरीक चाचणीस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक (Unlock) करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा परीक्षा / मुलाखतीकरीता उमेदवाराला प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

१३ प्रस्तुत परिपत्रकामध्ये परीक्षेसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज स्वीकारण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या संकेतस्थळावरील मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा अंतर्गत '**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**' तसेच "**परीक्षा योजना**" विभागातील

**'सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षा'** मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व परिपत्रक अधिकृत समजण्यात येईल.

**१४** प्रस्तुत परिपत्रक आयोगाच्या www.mpsc.gov.in तसेच https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**१५** सदर परिपत्रकासोबतच्या **"विवरणपत्र-१"** मध्ये विषयांकित परीक्षेची योजना, अभ्यासक्रम,प्रश्नसंख्या व गुण उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**१६.** सदर परिपत्रक रजेवर/प्रतिनियुक्तीवर असणाऱ्या कर्मचाऱ्यांसह सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

**१७** सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८११०५१३२२१३५००७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Imtiyaz Mushtaque Kazi

Digitally signed by Imtiyaz Mushtaque Kazi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=711589caceff9b0bb07e3c6556e724501d0c5ea5c63b3146314d51ec0e87d0a6, serialNumber=77a529748c5e7c1ba7a66e81c654ba3c492fda5b29e076241db1ba213ddedf4e, cn=Imtiyaz Mushtaque Kazi
Date: 2018.11.05 13:26:38 +05'30'

**(इ.मु.काझी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. सर्व मंत्रालयीन विभाग,
२. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, (पत्राने)

# विवरणपत्र - १

## सहायक कक्ष अधिकारी मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षेची सुधारित परीक्षा योजना व अभ्यासक्रम -

**१.१ परीक्षेचे टप्पे - लेखी परीक्षा. लेखी परीक्षेच्या गुणांच्या आधारे अंतिम निवड करण्यात येईल.**

**१.२ एकूण प्रश्नपत्रिका- दोन.**

**१.३ एकुण २०० गुण**

**१.४ परीक्षा केंद्र :- प्रस्तुत परीक्षा फक्त मुंबई केंद्रावर घेण्यात येईल.**

## - : परीक्षा योजना :-

| प्रश्नपत्रिका क्रमांक व संकेतांक | विषय | दर्जा | माध्यम | प्रश्नसंख्या व गुण | कालावधी | परीक्षेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|
| पेपर - १ (०८८) | इंग्रजी | बारावी | इंग्रजी | १०० | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| | मराठी | बारावी | मराठी | | | |
| | सामान्य ज्ञान, शासकीय योजना व शासनाशी संबंधीत बाबी | -- | | | | |
| पेपर - २ | कार्यालयीन कामकाजाचे ज्ञान व पध्दती | -- | मराठी | १०० | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

## २. अभ्यासक्रम :-

**प्रश्नपत्रिका - १**

| विषय | गुण |
|---|---|
| (१) **मराठी** :- व्याकरण, शुध्दलेखन व विरामचिन्हे यांचे नियम, शब्दांच्या जाती (प्रकार), काळ व अर्थ, वाक्यप्रकार, शब्दसिध्दी, पारिभाषिक शब्द, म्हणींचा अर्थ व उपयोग, वाक्प्रचारांचा अर्थ व उपयोग. | २५ |
| (२) **इंग्रजी** :- Common vocabulary, Sentence structure, Grammar, Comprehension of passage. | २५ |
| (३) **शासकीय योजना व शासनाशी संबंधीत बाबी** :- विभागाच्या महत्वाच्या योजना, योजनांची नावे, अनुदान मर्यादा, केंद्र-राज्य हिस्सा लाभार्थी पात्रता इत्यादी | २५ |
| (४) **सामान्य ज्ञान** :- इतिहास, भूगोल, कला, क्रीडा, साहित्य, पुरस्कार, चालू घडामोडी, माहिती अधिकार अधिनियम-२००५, राज्य शास्त्र, इत्यादी | २५ |
| **प्रश्नपत्रिका - १ ची एकूण प्रश्नसंख्या व गुण** | १०० |

**प्रश्नपत्रिका - २** : मंत्रालयातील लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग-अ आणि विभाग-ब, सोडविणे आवश्यक आहे व महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील लिपीकवर्गीय कर्मचाऱ्यांनी विभाग-अ आणि विभाग-क सोडविणे आवश्यक आहे.

| **विभाग - अ : मंत्रालय व आयोग यांच्या सामाईक कामकाजाविषयीचे घटक :- (९०६)** | **गुण** |
|---|---|
| (१) भारताचे संविधान :- मूलभूत अधिकार (अनुच्छेद १२ ते ३०)<br>राज्य धोरणाची निदेशक तत्वे (अनुच्छेद ३६ ते ५१)<br>मूलभूत कर्तव्ये (अनुच्छेद - ५१ (क) ) | २५ |
| (२) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ | २५ |
| (३) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ : नियम क्र. ९ ते २०, २७, ३१ ते ४५, ४७. | २५ |
| **विभाग - अ** ची एकूण प्रश्नसंख्या व गुण | ७५ |
| **विभाग - ब: फक्त मंत्रालयाच्या कामकाजासंबंधिचे घटक :- (९०७)** | **गुण** |
| **(१)** मंत्रालयातील कार्यालयीन पध्दतीची नियमपुस्तिका. | १० |
| **(२)** **अ.** मंत्रालयातील कामकाजविषयक नियम व त्यासंबंधीच्या सूचना.<br>**ब.** प्रशासकीय सुधारणा व कल्याणकारी धोरणे यासंबंधात अंमलबजावणीसाठीचे शासनाचे धोरण/वेळोवेळी शासनाने घेतलेले निर्णय. | ०५ |
| (३) <u>**विधीमंडळ कामकाज :-**</u><br>**(३.१)** <u>**विधानसभा नियम**</u> **-** नियम क्रमांक ६८,६९,७०,७२,७४ [प्रश्न] , ८६ [अल्प मुदतीच्या नोटीसीचे प्रश्न] , ९० [पुरवणी प्रश्न] , ९२,९४ [अर्धातास चर्चा], १०१ ते १०३ [अल्पवेळ चर्चा], १०६ ते ११० [ठराव], १९८ व १९९[संयुक्त समित्या], २०६ व २०७ [ लोकलेखा समिती], २०८ ते २१० [अंदाज समिती], २२६ ते २२८ [आश्वासन समिती].<br>**(३.२)** <u>**विधान परिषद नियम -**</u> नियम क्र. ६६,६७,६८,७०,७२ [प्रश्न], ८४ [अल्पसूचना प्रश्न], ८८ [ पुरवणी प्रश्न], ९०,९२ [अर्धा तास चर्चा], ९७ ते ९९ [अल्पकालिन चर्चा], १०२ ते १०६ [ठराव] | ०५ |
| (४) **भारताचे संविधान** भाग-६ मधील प्रकरण १ ते ४ [अनुच्छेद १५२ ते २१३] | ०५ |
| **विभाग - ब** ची एकूण प्रश्नसंख्या व गुण | २५ |
| **किंवा** | |
| **विभाग - क : फक्त महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कामकाजासंबंधीचे घटक (९०८)** | **गुण** |
| **(१)** भारताच्या संविधानातील लोकसेवा आयोगासंबंधीचे अनुच्छेद ३१५ ते ३२३. | ०५ |
| **(२)** अ. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील कार्यालयीन कार्यपध्दती.<br>ब. महाराष्ट्र लोकसेवा आयोग (सदस्य व कर्मचारी) (सेवेच्या शर्ती) विनियम, १९७१. | १० |
| **(३)** महाराष्ट्र लोकसेवा आयोग व शासन दरम्यानच्या पत्रव्यवहार करण्याविषयीच्या कार्यपध्दती व त्यासंबंधीच्या सूचना. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची कार्य नियमावली (Rules of Procedure) | ०५ |
| **(४)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत प्रसिध्द करण्यात येणा-या अधिसूचना, जाहिराती व वार्षिक अहवाल. | ०५ |
| **विभाग - क** ची एकूण प्रश्नसंख्या व गुण | २५ |